पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

# अर्थशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल

## २०१९-२०२०

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

## अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये अर्थशास्त्र विभागाने पुढील कार्याक्रमाचे आयोजन केले.

१) **अर्थसंकल्पाचे प्रक्षेपन:-** दि. ०५ जुलै २०१९ रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी २०१९-२०२० या वर्षासाठीचा "केंद्रीय अर्थसंकल्प २०१९-२०२०" लोकसभेत सादर केला. या अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपन अर्थशास्त्र विभागात करण्यात आले. यावेळी डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी विद्यार्थ्यांना अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे स्पष्ट केले. यावेळी डॉ. महेश थोरात व प्रा. नितीन माळेगाकवर यांची प्रमुख उपस्थिती होती

२) **अतिथी व्याख्यान:-** अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये दोन अतिथी व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. दि. ०७ ऑक्टोबर २०१९ रोजी "भारताचा आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल" या विषयावर डॉ. पी. एन. डापके (अर्थशास्त्र विभाग, पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय, औरंगाबाद) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच दि. १३ जानेवारी २०२० रोजी "सार्वजनिक उत्पन्नाची साधने" या विषयावर डॉ. गोविंद परडे (शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नायगाव बाजार, जि. नांदेड) यांच्या अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

३) **प्रकल्प भेट - हर्सुल कारागृहातील कार्यशाळा विभाग:-** दि. ०६ फेब्रुवारी २०२० रोजी "हर्सुल कारागृह" औरंगाबाद येथे भेट दिली. या प्रकल्प भेटीत विद्यार्थ्यांनी कारागृहातील विविध केंद्रामध्ये सहाय्याने उत्पादित केल्या जात असलेल्या विविध वस्तूंची उत्पादन प्रक्रियांची माहिती घेतली. यामध्ये लोखंडी कामात लोखंडी कपाट, लोखंडी बेंचेसची माहिती घेतली. लाकूड काम विभागात लाकडी कपाट, लाकडी बेंचेस, लाकडी कोळपाट बोलने, लाकडी सोपा तयार करण्याची प्रक्रिया समजावून घेतली. त्यानंतर कापड विभागास भेट दिली. यात प्रथमत: तयार कपडे विभागास भेट दिली. त्यात कारागृहातील कैदी शिवत असलेले महिला व पुरुषांचे विविध कपड्यांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. त्यानंतर कापड विणकाम प्रकल्पास भेट देण्यात आली. कापड विणकाम प्रकल्पात सतरंजीचे विणकाम, तसेच मशीन यंत्रमागाद्वारे विणल्याजात असलेले टॉवेल, चादरी व साधे व रंगीत कापड विणण्याच्या प्रक्रियेची विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. कारागृहातील / कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना त्याच्या आवडीनुसार विविध कार्यशाळांपैकी एका कार्यशाळेत प्रशिक्षण दिले जाते. जेणेकरुन तो त्याची शिक्षापूर्ण झाल्यावर स्वत:च्या पायावर उभा राहू शकेल. तसेच शिक्षापूर्ण करत असतांना त्याच्या कामाचा मोबदला त्याला दिला जातो. या मोबदल्याची रक्कम तो आपल्या नातेवाईकांना कुटुंबीयांना पाठवू शकतो. कारागृहातील कार्यशाळा भेटीनंतर औरंगाबाद येथील प्रोझोन मॉलला भेट देण्यात आली. याठिकाणी विद्यार्थ्यांनी आधुनिक विक्रीची प्रक्रिया समजावून घेतली. या प्रकल्प भेटीत अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास ही सामाजिकशास्त्रे व वाणिज्य विभाग यांचा सहभाग होता.

४) **पंडित दीनदयाळ जयंती:-** अर्थशास्त्र विभागाच्यावतीने पंडित दीनदयाळ यांची जयंती साजरी करण्यात आली. दीनदयाळ जयंतीचे औचित्य साधून विभागाच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. तसेच जयंतीच्या निमित्ताने व्याख्यान कार्यक्रमाचेही आयोजन केले होते.

४.१) **वक्तृत्व स्पर्धा:-** दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीचे औचित्य साधून विभागाच्या वतीने २४ सप्टेंबर २०१९ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वक्तृत्व स्पर्धेत ८ वी ते १० वी साठीचा एकगट व ११ वी ते पदवी पर्यंतचा दुसरा गट असे दोन गट करण्यात आले होते. यापैकी ८ वी ते १० वी पर्यंतच्या गटात प्रजेश राजपूत ने प्रथम, दिव्या जाधव ने द्वितीय तर साक्षी कावळे ने तृतीय क्रमांक मिळविला. ११ वी ते पदवी पर्यंतच्या गटात मृणाल मनोरकरने प्रथम, दिपाली बोलकरने द्वितीय तर राजू खरात ने तृतीय क्रमांक मिळविला. या वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. संजिवकुमार पांचाळ व प्रा. नितीन माळेगावकर यांनी काम पाहिले.

४.२) **व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन:-** पंडित दीनदयाळ जयंतीचे औचित्य साधून विभागाच्या वतीने दिनांक २५ सप्टेंबर २०१९ रोजी व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास श्री. पंकज भारसाखळे (राज्यपाल नियुक्त, अधिसभा सदस्य, डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद) हे प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टक्ले हे उपस्थित होते तर श्री. गजानन हरकळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून कार्यक्रम घेण्यामागची भूमिका डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी व्यक्त केली. पाहूण्यांचा परिचय डॉ. संदीप जगताप यांनी करुन दिला. कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री. पंकज भारसाखळे म्हणाले की, पंडित दीनदयाळ यांनी एकात्म मानवतावादाचा दृष्टीकोन जगाला सांगितला. त्यांच्या जीवनात सदैव गरीब व पिडीतांसाठी कनवळा दाखविला. त्यामुळे मानवतावादी दृष्टिकोन पंडित दीनदयाळ यांच्याकडून शिकला पाहिजे. कार्यक्रमात सुरवातीस प्रजेश राजपूत, दिव्या जाधव व साक्षी कावले या विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाळ यांच्या जीवन व कार्याविषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. दिपाली बोलकर ने केले, प्रार्थना कु. जयश्री वाघ व कु. शिवानी चंद्रे या विद्यार्थिनींनी म्हटली, सुविचार कु. सिमा जाधव ने सांगितला. या कार्यक्रमास श्री. गजानन हरकळ (श्री संत सावता गुरुकुल, फुलंब्री) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. यावेळी त्यांनी दीनदयाळ यांच्या आर्थिकनिती बद्दल आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे आभार प्रा. नितीन माळेगावकर यांनी मानले. या कार्यक्रमात दिनांक २४ सप्टेंबर रोजी घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख वक्ते श्री. पंकज भारसाखळे यांनी एकूण पाच हजार रुपयांचे बक्षीस दिले. या बक्षीसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमात करण्यात आले. डॉ. संजिवकुमार पांचाळ यांनी या कार्यक्रमात निकाल जाहीर केला.

५) **ऑनलाईन शिक्षणा भर:-** दि. १६ मार्च २०२० मार्च पासून कोरोना-१९ च्या प्रार्दुभावामुळे दिनांक १६ मार्च २०२० मार्च पासून महाविद्यालय बंद करण्यता आले. तसचे विद्यापीठाच्या आदेशाने परीक्षा सुद्धा पुढे ढकलल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा होईपर्यंत ऑनलाईन शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातही बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांवर विशेष भर देण्यात आला. बी. ए. तृतीय वर्षाच्या अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा एक व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करण्यात आला. त्यात त्यानंतर त्या ग्रुपवर अर्थशास्त्राच्या औद्योगिक अर्थशास्त्र व संशोधन पद्धती (XIII) व औद्योगिक अर्थशास्त्र (XIV) या पेपरचा अभ्यासक्रम पाठवण्यात आला. त्यानंतर अभ्यासक्रमावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न देण्यात आले. दीर्घोत्तर प्रश्नानंतर संकल्पना स्पष्ट करा व थोडक्यात उत्तरे द्या ही प्रश्न देण्यात आली. ग्रुप मध्ये एकूण १३ विद्यार्थी सहभागी होते. विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहून ग्रुपवर त्याचे फोटो टाकले. तसेच गुगल फार्मचा वापर करुन विद्यार्थ्यांना औद्योगिक अर्थशास्त्र या पेपरच्या अनेक प्रश्नमंजुषा पाठवण्यात आला.

५.१) **शैक्षणिक व्हिडिओची निर्मिती:-** विभागाच्या वतीने, लॉकडॉऊनच्या काळात विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे यादृष्टीने विभागाच्या वतीने शैक्षणिक व्हिडिओची निर्मिती करण्यात आली. त्यात "परीक्षेतील वेळेचे नियोजन" हा व्हिडिओ विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये प्रत्यक्ष प्रश्नपत्रिका सोडवत असतांना वेळेचे नियोजन कसे करावे या संदर्भात होता. या व्हिडिओला दिनांक ५ जून २०२० पर्यंत ८३२ लोकांनी पाहिले. तसेच विषयाला अनुसरुन, सार्वजनिक वित्त या पेपरमधील सार्वजनिक महसूल या घटकावर व्हिडिओंची निर्मिती केली. दिनांक ५ जून २०२० पर्यंत ४१३ लोकांनी ते व्हिडिओ पाहिले.

५.२) **सर्वेक्षण (गुगल फॉर्मच्या साहाय्याने) डिजिटल साहित्याचा वापर:-** कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे महाविद्यालये बंद असतांना, अनेक प्राध्यापकांनी ऑनलाईन शिक्षणावर भर दिला. परंतु ऑनलाईन शिक्षण पद्धती बाबत विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन किंवा कल काय आहे? हे जाणून घेणे सुद्धा गरजेचे आहे या दृष्टीने अर्थशास्त्र विभागाच्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून "डिजिटल साहित्याचा वापर" या विषयावर सर्वेक्षण करण्यात आले. याला ३९ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

५.३) **गुगल क्लासरुमची निर्मिती:-** लॉकडॉऊनच्या काळात विद्यार्थ्यांना अभ्यासात व्यस्त ठेवण्यासाठी बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Google Classroom ची निर्मिती करण्यात आली. त्यामार्फत विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती व औद्योगिक अर्थशास्त्र या पेपरचे वाचन साहित्य, मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका पाठवण्यात आल्या. औद्योगिक अर्थशास्त्राच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर संकल्पना व थोडक्यात उत्तरे द्या सोडवण्यास दिले. काही विद्यार्थ्यांना त्या सोडवून गुगल क्लासरुम मध्ये अपलोड करण्यास काहीणी व्हॉट्सॲपवर पाठवल्या.

**डॉ. पी. एम. कल्याणकर**

**प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले**

**प्राचार्य**
**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय**
**फुलंब्री जि. औरंगाबाद**

अर्थशास्त्र विभाग - २०१९-२०२०

फोटो अहवाल



जुलै २०१९ रोजी "केंद्रीय अर्थसंकल्प २०१९-२०" चे विभागात थेट प्रक्षेपण करण्यात आले.




"केंद्रीय अर्थसंकल्प २०१९-२०" च्या थेट प्रक्षेपणास विद्यार्थ्यांचा लाभलेला प्रतिसाद.



दि. ०७ ऑक्टोबर २०१९ रोजी डॉ. पी. एन. डापके यांनी भारताचा आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल या विषयावर अतिथी व्याख्यान देताना



दि. ०७ ऑक्टोबर २०१९ रोजीच्या अतिथी व्याख्यानास लाभलेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद.



दि. १३ जानेवारी २०२० रोजी "सार्वजनिक उत्पन्नाची साधने" या विषयावर अतिथी व्याख्यान देतांना डॉ. गोविंद परडे



दि. १३ जानेवारी २०२० रोजी आयोजित अतिथी व्याख्यानात व्याख्यानाचे आभार मानतांना श्री. राजू खरात




पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम., व्यासपिठावर प्रा. नितीन माळेगावकर व डॉ. संजिवकुमार पांचाळ



वक्तृत्व स्पर्धेत सहभागी स्पर्धक कु. साक्षी कावले, पंडित दीनदयाळ यांच्या जीवन व कार्या विषयी बोलतांना




वक्तृत्व स्पर्धेत सहभागी स्पर्धक प्रजेश राजपूत, पंडित दीनदयाळ यांच्या जीवन व कार्या विषयी बोलतांना




वक्तृत्व स्पर्धेत सहभागी स्पर्धक, पंडित दीनदयाळ यांच्या जीवन व कार्या विषयी बोलतांना




वक्तृत्व स्पर्धेत सहभागी स्पर्धक कु. मृणाली मनोरकर, पंडित दीनदयाळ यांच्या विचार व कार्याविषयी बोलतांना




वक्तृत्व स्पर्धेत सहभागी कु. दिपाली बोलकर, पंडित दीनदयाळ यांच्या विचार व कार्याविषयी बोलतांना




दि. २५ सप्टेंबर २०१९ रोजी आयोजित पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करतांना कु. दिपाली बोलकर, व्यासपिठावर श्री. गजानन हरकळ, श्री. पंकज भारसाखळे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रार्थना म्हणतांना कु. जयश्री वाघ व कु. शिवानी चंद्रे




पंडित दीनदयाळ जयंती कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. पी. एम. कल्याणकर




पंडित दीनदयाळ जयंती कार्यक्रमात मनोगत व्यक्त करतांना स्पर्धक प्रजेश राजपूत




पंडित दीनदयाळ जयंती कार्यक्रमात मनोगत व्यक्त करतांना स्पर्धक कु. दिव्या जाधव




पंडित दीनदयाळ यांच्यावरील वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर करतांना परीक्षक डॉ. संजिवकुमार पांचाळ




पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकाचे स्वागत करतांना

श्री. पंकज भारसाखळे




पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकाचे स्वागत करतांना

श्री. पंकज भारसाखळे



पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्रमुख वक्ते श्री. पंकज भारसाखळे




पंडित दीनदयाळ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्रमुख वक्ते श्री. पंकज भारसाखळे



विभाग भेटी दरम्यान, अर्थशास्त्र विभागाची पाहणी करताना प्रा.डॉ . संजय साळुंके व
प्रा. डॉ. सुनील नरवडे सोबत, प्राचार्य डॉ. एस आर. टकले विभागाची माहिती सांगताना
डॉ. पी . एम . कल्याणकर

